# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण ३०, १९३९ (शके)**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६९**

---

### गेवराई (जि.बीड) येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेतील उर्दू माध्यमांच्या शिक्षकांची पद भरती करण्याबाबत

**(१) * ३५०१० श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून उर्दू माध्यमांचे इयत्ता ११ वी व १२ वीचे वर्ग नियमित सुरु असून सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षामध्ये या वर्गात सुमारे १०० विद्यार्थी शिकत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध नसल्याने शिक्षकांच्या पद भरतीच्या मागणीसाठी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग व संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांना लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, मौजे तलवाडा (ता. गेवराई) येथील जिल्हा परिषद शाळेतील उर्दू माध्यमांच्या इयत्ता १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी त्यांना शिक्षक उपलब्ध करुन उर्दू माध्यमांचे वर्ग सुरु करण्यासाठी शासन परवानगी देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अनुदानित पदावर कायम शिक्षकांची नेमणूक करण्याबाबतची कार्यवाही करुन लोकप्रतिनिधी यांच्या मागणी पत्राला कोणता प्रतिसाद दिला आहे वा देण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात उर्दू माध्यमाच्या इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये एकुण ७९ विद्यार्थी शिकत आहेत, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उर्दू माध्यमाच्या इयत्ता १० वी च्या वर्गास शासन मान्यता असून सदर वर्गासाठी शिक्षकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(४) शिक्षकांची रिक्त पदे “पवित्र” या संगणकीय प्रणालीव्दारे दिनांक २३/०६/२०१७ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपध्दतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नियमबाह्यरित्या शिक्षकांची नेमणूक केल्याची चौकशी करण्याबाबत

**(२) * ३५५२९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०३० ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २ मे, २०१२ च्या शासन निर्णयानुसार राज्यात अतिरिक्त ठरलेले शिक्षक पूर्णपणे समायोजित झाल्याशिवाय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नवीन भरती करण्यात येऊ नये असे आदेश असतांना या शासन निर्णयाचे उल्लंघन करुन राज्यात प्राथमिक विभागात ७९६, माध्यमिक विभागात ४५७० व उच्च माध्यमिक विभागात १५५० अशा एकूण ६९१६ शिक्षकांच्या नवीन नियुक्त्या करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी वैयक्तिक मान्यता तपासणी समिती गठीत करून मान्यता देणाऱ्या शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक यांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या असून या प्रकरणी शिक्षणाधिकाऱ्यांनी व शिक्षण उपसंचालकांनी सुनावणी घेऊन प्राथमिक विभागाच्या १६०, माध्यमिक विभागाच्या ३३८ व उच्च माध्यमिक विभागाच्या १११ शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी या सर्व याचिका निकाली काढून शिक्षण आयुक्त, पुणे यांनी वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचे काढलेले परिपत्रक रद्द केले असून शिक्षण संचालक, प्राथमिक व माध्यमिक, पुणे यांना पत्र पाठवून या सर्व शिक्षण सेवकांना नियमित सेवा सातत्य देऊन त्यांचे वेतन अदा करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी पाठविलेल्या पत्रानुसार दोषी असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ व त्यास अनुसरुन शासन शुध्दीपत्रक दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ अन्वये सुनावणीची प्रक्रिया एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.
(४) कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विनाअनुदानित शाळेसंदर्भात मूल्यांकनाकरिता आदेश निर्गमित करण्याबाबत

**(३) * ३५८४९ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने विनाअनुदानित शाळेसंदर्भात मूल्यांकनाकरिता दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ च्या शासन परिपत्रकानुसार तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अल्पसंख्यांक संस्थांना शेवटच्या वर्गाच्या पटात ३० ऐवजी २० पट करुन त्याबाबत नवीन शासन आदेश निर्गमित करण्याचे निदेश शासनाला दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी दिले आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने अद्यापही कोणतेच आदेश काढले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उक्त आदेश निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) होय.
(३) धोरणात्मक बाब असून याबाबत आवश्यक कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लासलगांव विंचूर (जि.नाशिक) सह इतर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी सौरऊर्जेचा पथदर्शी प्रकल्प राबविण्याबाबत

**(४) * ३४८८४ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लासलगांव विंचूर (जि.नाशिक) सह १६ गावांसाठी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी जिल्हा वार्षिक नाविन्यपूर्ण योजनेतून सौर ऊर्जा सयंत्र मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा प्रशासनाकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ व दिनांक ४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेकरीता सौरऊर्जेचा पथदर्शी प्रकल्प राबविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

दिनांक ४ सप्टेंबर २०१७ चे लासलगाव विंचूर (जि.नाशिक) सह १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी सोलर जनरेटर प्लँट मंजूर करणेबाबत पत्र जिल्हा परिषदेस प्राप्त झाले आहे.
(२) त्या अनुषंगाने महाव्यवस्थापक, महाराष्ट्र ऊर्जा विकास महामंडळ (मेडा) नाशिक व जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे निधी प्राप्त होईल किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नगर परिषदेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना शासनाच्या वैद्यकीय प्रतिपुर्तीचा लाभ देण्याबाबत

**(५) * ३५२४१ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक २९५६१ ला दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १२ मे, १९८९ च्या शासन निर्णयाच्या वैद्यकीय प्रतिपुर्तीचा लाभ नगर परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करणे आवश्यक असतांना फक्त दिनांक १५ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार प्राथमिक शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना हा लाभ देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर परिषदेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्यापपर्यंत लाभ देण्यात आला नसून असा भेदभाव करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नगर परिषदेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना शासन वैद्यकीय प्रतिपुर्तीचा लाभ देण्यासाठी नव्याने शासन आदेश निर्गमित करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) नगरपरिषदा/नगरपालिका/महानगरपालिकांच्या शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील माध्यमिक शाळांमधील सेवेत असलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपूर्ती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनधिकृत खाजगी कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(६) * ३५२०५ डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २६९६३ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनधिकृतरित्या चालविण्यात येणाऱ्या अनधिकृत व तत्सम खाजगी कोचिंग क्लासेसवर शालेय शिक्षण विभागाने नियंत्रण ठेवण्यासाठी कोचिंग क्लास नियंत्रक कायदा अंमलात आणण्याच्या अनुषंगाने नविन विधेयक तयार करण्याबाबतच्या विचाराधीन बाबीवर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विधी व न्याय विभागाकडील यासंबंधीच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने नेमण्यात आलेल्या अभ्यास समितीच्या अप्राप्त शिफारशी शासनास प्राप्त झाल्या आहेत काय व त्यानुषंगाने पुढे कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विचाराधीन बाबीवरील कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) राज्यातील खाजगी शिकवणी वर्गांवर नियंत्रणाकरीता अधिनियम तयार करण्याच्या अनुषंगाने विधेयकाचा मसूदा तयार करण्यासाठी दिनांक ०४/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या बैठका झाल्या असून मसूदा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यात महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या रॅगिंग व लैंगिक शोषणावर प्रतिबंध घालण्याबाबत

**(७) * ३५६९१ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंग व लैंगिक शोषण यामध्ये वाढ होत असल्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या रॅगिंग व लैंगिक शोषणावर प्रतिबंध घालण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

अमरावती येथील रॅगिंगची एक घटना वगळता अशा प्रकारच्या घटना राज्यामध्ये आढळून आलेल्या नाहीत.

अमरावती येथील प्रकरणात संबंधित संस्थेतील अँटी रॅगिंग समिती व वरिष्ठामार्फत चौकशी करुन या प्रकरणात गाडगे नगर पोलीस स्टेशन, अमरावती येथे दिनांक ०१ सप्टेंबर, २०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, पोलीस तपास सुरु आहे.

राज्य रॅगिंग मुक्त असावे, या अनुषंगाने विभागाच्या दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ च्या पत्रान्वये सर्व संबधितांना सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वरीष्ठ महाविद्यालयातील तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(८) * ३५४१७ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३३९ ला दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्वावर कार्यरत प्राध्यापकांना आठवड्याला किमान १४ तास व प्रती तास रुपये ५००/- प्रमाणे मानधन मंजुर करुन हे मानधन दरमहा नियमितपणे देण्याबाबत शासनाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर कोणता निर्णय घेण्यात आला व त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे काय, तसेच उक्त निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, आठवड्याला फक्त ७ तास व प्रती तास रुपये २५०/- मानधन तसेच सदरचे मानधन प्रतीमहा न देता वर्षाला एकदाच देण्यात येत असल्यामुळे प्राध्यापकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर तासिका तत्वावरील प्राध्यापकांना प्रती तास रुपये ५००/- व आठवडयाला किमान १४ तास देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही. याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांचे लेखापरीक्षण करण्याबाबत

**(९) * ३४७०३ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या वेतनेत्तर अनुदानाच्या विनियोगाचे लेखापरिक्षण मागील २० वर्षापासून आजपावेतो करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी प्राथमिक शाळांचे लेखापरीक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे. सन २००४-०५ ते २०१२-१३ या कालावधीत वेतनेतर अनुदान बंद होते. संबंधित संस्था/शाळांचे खाजगी सनदी लेखापालामार्फत लेखापरीक्षण करण्यात येते. तसेच, शिक्षणाधिकारी संबंधित शाळांचे अनुदान निर्धारण करुन शाळांना वेतनेत्तर अनुदान मंजूर करतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध अहवाल मंजूर करण्याबाबत

**(१०) * ३४८६६ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबत समितीने दिलेला अहवाल मंजूर करुन इतर अनुषंगिक मागण्यांसाठी शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे येथे दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकेतर संघटनेच्या मागण्यांचे तसेच त्यावर शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

-----------------

## मुरुड-जंजिरा, बोर्ली, काशिद, बारशीव व नांदगाव (जि.रायगड) येथील अनधिकृत बांधकामाबाबत

**(११) * ३५७८२ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४१९७ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरुड-जंजिरा, बोर्ली, काशिद, बारशीव व नांदगाव (जि.रायगड) येथील समुद्रकिनारी काही धनाड्य लोकांनी सागरी नियमन क्षेत्र व पर्यावरण कायदयाचे उल्लंघन करुन अधिकारी व बांधकाम व्यावसायिकांच्या संगनमताने अलिशान बंगल्याची अनधिकृतपणे बांधकामे केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करुन व्यावसायिकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) अलिबाग व मुरुड तालुक्यातील समुद्रकिनारी बांधण्यात आलेल्या अनुक्रमे १४५ व १६७ बांधकामधारकांना महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२,५३,५४ व ५५ तसेच, पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम ३(१) प १५ अन्वये संबंधित तहसिलदाराकडून नोटीस बजावण्यात आल्या आहेत, सदर दाव्यांपैकी अलिबाग तालुक्यातील ६१ व मुरुड तालुक्यातील १०१ दाव्यांमधील अनधिकृत बांधकामाबाबत मा.न्यायालयाने तात्पुरते स्थगिती आदेश दिले आहेत.

सदर दोन्ही तालुक्यातील अनधिकृत बांधकामांपैकी अलिबाग तालुक्यातील ६९ व मुरुड तालुक्यातील ९५ प्रकरणांमध्ये महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२,५३,५४ व ५५ व केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक ६/१/२०११ रोजीच्या अधिसूचनेमधील निदेशांचे उल्लंघन केल्याने संबंधिताविरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम ३(१) व १५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

-----------------

## नागपूर शहरात मिनरल वॉटरच्या नावाखाली थंड पाण्याची विक्री होत असल्याबाबत

**(१२) * ३५१५१ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात पाण्यावर युव्ही स्टरीलायझेशन, सूक्ष्म गाळणी, ओझोनायझेशन इत्यादि प्रक्रिया न करता पाणी थंड करुन मिनरल वॉटरच्या नावाखाली कॅनव्दारे विविध समारंभात विक्री करुन ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.अन्न व औषधी प्रशासन मंत्री तसेच जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवदेनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे उपनगरात क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(१३) * ३५२७६ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे मधील हडपसर, कोथरुड, कर्वेनगर या उपनगरात क्रीडा संकुल नसल्याचे तसेच येरवडा, सहकार नगर व इतर ठिकाणच्या क्रीडा संकुलाची दुर्दशा झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार पुणे उपनगरात क्रीडा संकुल उभारण्यासाठी व क्रीडा संकुलाची झालेली दुर्दशा सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सरल प्रणालीची संगणकीय माहिती नोंदणी करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत

**(१४) * ३६०२० श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या धोरणामुळे विद्यार्थ्यांची माहिती भरताना आधार कार्डमधील माहिती सरल प्रणालीत भरणे बंधनकारक केले असताना सदर सरल प्रणालीची संगणकीय माहिती भरताना भारनियमनामुळे राज्यात सर्वत्र अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विद्यार्थी नोंदणीकरिता माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत दिलेल्या मुदतीत १०० टक्के नोंदणी पूर्ण होवू शकणार नसल्याने सदर नोंदणीस शासन मुदत वाढवून देण्याचा विचार करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नोंदणीत शाळा नोंदवही आणि आधार कार्डवरील नोंदी यामधील तफावतीबाबत शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विदयार्थी असतानाही तफावतीमुळे निर्माण होणारी पट संख्येची अडचण, त्यामुळे अतिरिक्त होणारे शिक्षक यासारख्या निर्माण होणाऱ्या समस्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) शाळा नोंदवहीतील विद्यार्थ्यांचे नाव व आधारकार्डवरील नोंदी यात थोडी तफावत असेल व नावात साम्य असेल तर ते नाव अंतिम होईल असे शासन निर्णय, दिनांक १४/०८/२०१७ अन्वये आदेश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रुग्णालये, न्यायालये व शैक्षणिक संस्था शांतता प्रवण क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत

**(१५) * ३४९३७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकही शांतता प्रवण क्षेत्र नसल्याची माहिती राज्य शासनाने मा.उच्च न्यायालयात दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने ध्वनीप्रदूषण नियमात दुरुस्त्या केल्या आहेत व महाराष्ट्र राज्याच्या विनंतीनंतर केंद्र शासनाने या दुरुस्त्यांना मान्यता दिली असून या नव्या नियमानुसार रुग्णालये, न्यायालये आणि शैक्षणिक संस्था यांचा समावेश शातंता प्रवण क्षेत्रात येत नसल्याचे म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने रुग्णालये, न्यायालये व शैक्षणिक संस्था मधील शातंताप्रवण क्षेत्र हटविण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यातील वाढते ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने अध्यादेश काढून शांतता प्रवण क्षेत्रांची यादी घोषित करुन रुग्णालये, न्यायालये व शैक्षणिक संस्था शातंता प्रवण क्षेत्रात समाविष्ट करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१), (२) व (३) केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाने दिनांक १० ऑगस्ट, २०१७ च्या अधिसूचनेव्दारे सुधारित ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ निर्गमित केली असून त्यानुसार राज्यातील रुग्णालये, न्यायालये व शैक्षणिक संस्थापासून १०० मीटर परिघातील क्षेत्र शांतता क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांऐवजी राज्य शासनास दिले आहेत.

(४) त्यानुसार राज्यात केंद्रिय सुधारित ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ या नियमांना अनुसरुन रुग्णालये, न्यायालये व शैक्षणिक संस्थापासून १०० मीटर परिघातील क्षेत्र शांतता क्षेत्र निश्चित करण्याबाबत दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## महाड औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कारखान्यातून प्रदूषण झाल्याबाबत

**(१६) * ३५६०८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३२४५८ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक रासायनिक कारखाने असून या कारखान्यातील रासायनिक प्रदूषित पाणी तसेच वायू प्रदूषणाच्या समस्या मागील अनेक वर्षांपासून कायम राहिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रासायनिक कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीच्या पात्रात सोडल्याने नदीतील मासे मृत्यूमुखी पडल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रासायनिक प्रदूषित पाणी सोडण्याबाबत तसेच वायू प्रदुषण रोखण्याबाबत कार्यवाही करुन सदर कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) महाड औद्यागिक वसाहतीत १८२ उद्योग असुन जल व हवा प्रदूषण करण्याच्या उद्योगांकडून अद्यायावत प्रदूषण संनियंत्रण यंत्रणा स्थापित करण्यात आली असल्याने व सामूहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यरत असल्याने प्रदूषण संनियंत्रणामध्ये सुधारणा झाली आहे.

(२) नाही. तथापि, दिनांक ६/९/२०१७ रोजी टेमघर नाल्यामध्ये अशी घटना घडली होती.

(३) सदर घटनेच्या अनुषंगाने महाड औद्योगिक वसाहतीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात आलेल्या दिनांक ०६/०९/२०१७ रोजी करण्यात आलेल्या पाहणी नुसार ०४ कारखान्यांवर उत्पादन बंद करण्याची कारवाई करण्यात आली होती. यापैकी ०३ कारखान्यांनी सुधारणा केल्यानंतर त्यांना पुन्हा उत्पादन सुरु करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच हवा प्रदूषणात दोषी आढळलेल्या १ कारखान्यास कारणे दाखवा नोटीस, ३ कारखान्यांना प्रस्तावित निर्देश व २ कारखान्यास उत्पादन बंद करण्याचे आदेश बजावण्यात आले होते. सदर २ उद्योगांनी सुधारणा केल्यानंतर त्यांना पुन्हा उत्पादन सुरु करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिनांक १ व २ जुलै, २०१६ रोजी अनुदानास पात्र झालेल्या शाळांच्या पदामध्ये दुरुस्ती करून शुध्दीपत्रक निर्गमित करण्याबाबत

**(१७) * ३५६२१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ व २ जुलै, २०१६ रोजी राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्या अनुदानास पात्र झाल्या असून सदर घोषित केलेल्या पात्र शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतरांच्या पदामध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना अनुदान देणेबाबत शासन सकारात्मक विचार करत असून सदर शाळा व वर्ग तुकड्या यांना अनुदान देत असताना प्रत्यक्ष कार्यरत असणाऱ्या शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे घोषित शासन आदेशातील पदामध्ये दिसत नसल्याने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी क्षेत्रिय अधिकारी यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शासन आदेशामध्ये घोषित केलेल्या पदांमध्ये दुरुस्ती करुन शुध्दीपत्रक निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

(२) शासन आदेशातील पदांमध्ये दुरुस्तीबाबत क्षेत्रियस्तरावर तक्रारी करण्यात आल्या आहेत. तथापि, संचमान्यतेनुसार मंजूर असलेल्या पदांनाच अनुदान अनुज्ञेय आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठामध्ये स्त्री अभ्यास केंद्रे कार्यरत करण्याबाबत

**(१८) * ३५०१७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठामध्ये युजीसीच्या निर्देशानुसार सुरु झालेली स्त्री अभ्यास केंद्रे पदे न भरल्याने व नियमित न केल्याने बंद पडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठनिहाय या स्त्री अभ्यास केंद्रांची सद्य:स्थिती काय आहे तसेच स्त्री अभ्यास केंद्रांना मिळालेल्या अनुदानाचा वापर न होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्त्री अभ्यास केंद्रे कार्यरत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे स्त्री अभ्यास/महिला अध्ययन केंद्रे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या अनुदानातून/ विद्यापीठाच्या स्वनिधीतून/शासन अनुदानातून सुरु आहेत. उर्वरित विद्यापीठांमध्ये स्त्री अभ्यास केंद्रे अस्तित्वात नाहीत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानातून सुरु असलेल्या स्त्री अभ्यास/महिला अध्ययन केंद्रांना मिळालेल्या निधीचा वापर विद्यापीठांकडून झालेला आहे.

(३) विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रे हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनांपैकी एक योजना आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धोरणानुसार स्त्री अभ्यास केंद्रांचा आर्थिक भार प्रथमत: ५ वर्षांच्या कालावधीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून घेण्यात येतो. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून काही स्त्री अभ्यास केंद्रांना योजना कालावधी संपल्यानंतर वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे. काही स्त्री अभ्यास केंद्रे शासन अनुदानातून व काही स्त्री अभ्यास केंद्रे विद्यापीठांच्या विद्यापीठ निधीतून सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई पश्चिम (जि.पालघर) येथील नागरिकांना जलस्त्रोत उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) * ३५३४८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई पश्चिम (जि.पालघर) येथील नागरिकांना विहिर हाच एकमेव जलस्त्रोत असल्यामुळे मागील दोन वर्षापासून येथील ग्रामस्थांना पाण्यामुळे विविध आजारांची लागण होत असल्याचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विहिरींच्या पाण्यामध्ये क्षार, क्लोराईडचे प्रमाण अधिक असून ते पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा निष्कर्ष जलतपासणीनंतर काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसई पश्चिम येथील नागरिकांना दुसऱ्या जलस्त्रोताची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा पालघरमधील वसई तालुक्यातील एकूण ३१ ग्रामपंचायती असून त्यापैकी वसई पश्चिम पट्ट्यात एकूण ११ ग्रामपंचायती आहेत. वसई पश्चिम पट्ट्यातील काही भाग वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट आहे. जिल्हा परिषदेंतर्गत समाविष्ट ११ ग्रामपंचायतीमध्ये ५० सार्वजनिक विहिरी तसेच ४ नळ पाणीपुरवठा योजना व ५११ बोरवेल याव्दारे पाणीपुरवठा केला जात आहे.

नागरी भागातील काही ग्रामस्थ तेथील खाजगी/सार्वजनिक विहिरी व बोअरींगच्या पाण्याच्या स्त्रोतावर अवलंबून आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.पालघर यांच्या अहवालानुसार वसई तालुक्यात सन २०१६-१७ व २०१७-१८ मधील ऑक्टोबर, २०१७ पर्यंत जलजन्य आजारांचा उद्रेक झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

पालघर उपविभागीय प्रयोगशाळेमध्ये वसई तालुक्यातील प्राप्त पाणी नमुन्यांच्या जलतपासणीअंती कोणताही नमुना क्लोराईड बाधित आढळून आलेला नाही.

तथापि आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या अहवालानुसार वसई पश्चिम पट्ट्यातील नागरी भागातील पाणी नमुने तपासणीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मातोश्री काशीबेन ब्रजलाल वालिया शाळा बोरीवली (प.), मुंबई येथील वर्ग स्थलांतरीत करण्याबाबत

**(२०) * ३५८२२ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मातोश्री काशीबेन ब्रजलाल वालिया शाळा बोरीवली (प.), मुंबई या शाळेचे वर्ग पूर्वेकडील शाळेत स्थलांतरीत करण्यास शालेय शिक्षण विभागाने मान्यता दिली असली तरी त्यास पालकांचा विरोध असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाला पालकांचा विरोध असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शाळा प्रशासन व शिक्षण विभागाने पालकांच्या प्रश्नाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२), (३) व (४) या विषयासंदर्भात शाळेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांवरील अन्याय दूर करण्याबाबत

**(२१) * ३५७६१ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत (एम.एस.सी.आय.टी) परीक्षा न झालेल्या शिक्षकांची नियमित वेतनवाढ थांबवून रक्कम वसुली होत असल्याने शिक्षकांवरील अन्याय दूर करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक शाळेतील शिक्षकांची पदे ही तांत्रिक संवर्गात मोडत नसतानाही सन २००८ पासून वेतनवाढ थांबवून वसुली करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांची वसुली थांबविण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) संबंधित शिक्षकांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अपील केल्यामुळे तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आसनगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील पाणी टंचाईबाबत

**(२२) * ३४८३५ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०९८० ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसनगाव (पूर्व) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे लोकवस्ती वाढल्याने या परिसरातील गावांमधील तसेच संघवी पॅराडाईज गृहप्रकल्पासह अन्य गृहप्रकल्पांमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्यामुळे पावसाळयात देखील नागरिकांना खाजगीरित्या दररोज पिण्याच्या पाण्याचे टँकर्स स्वखर्चाने मागवावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भातसा धरण विभागाने धरणातून भातसा नदीत होणारा पाण्याचा विसर्ग कमी केल्यामुळे भातसा नदीची पाणीपातळी खाली जावून नदीवर असलेल्या आसनगाव-सावरोडी पाणीपुरवठा योजनेचा पाणीपुरवठा खंडीत झाल्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाल्याचे आसनगाव ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व पदाधिकारी यांनी संबंधित कार्यकारी अभियंता, भातसा धरण विभाग क्र.१ तसेच प्रधान सचिव, जलसंपदा विभाग व प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांना दिनांक १० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार निवेदन दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, “आसनगावातील पाणी टंचाईबाबत माहिती घेवून नेमकी समस्या काय आहे, हे तपासून पाणी सोडण्यात येईल” असे संबंधित कार्यकारी अभियंता, भातसा धरण विभाग क्र.१ यांनी त्याचवेळी (माहे सप्टेंबर, २०१७) आसनगाव ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना सांगितले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्याची संबंधित ग्रामपंचायतीची जबाबदारी असताना आसनगाव ग्रामपंचायत जाणीवपूर्वक मागील ३ महिन्यांपासून बेजबाबदारपणा करीत असल्याने पाणीपुरवठा सुरु करण्याच्या दृष्टीने तेथील नागरिकांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शहापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे तसेच प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचेकडे अनेकदा निवेदने सादर करुनही कार्यवाही झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भातसा नदीत होणारा पाण्याचा विसर्ग पुन्हा पुर्ववत सुरु करुन तेथील नागरिकांना सुरळीतपणे व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) ग्रामपंचायत, आसनगांव यांनी कार्यकारी अभियंता, भातसा धरण विभाग क्र.१, शहापूर यांना दिनांक ७/९/२०१७ रोजी निवेदन सादर केले आहे.

दिनांक ९/९/२०१७ पासून भातसा धरणातून १०० द.ल.लि./दिन पाणी भातसा नदीत सोडले असून, पाणीपुरवठा सुरळीतपणे सुरु आहे.

भातसा धरणातून आसनगांव ग्रामपंचायतीसह ३८ ग्रामपंचायती व इतर पाणी वापर संस्थांना नियमित पाणीपुरवठा सुरू असून पाणी टंचाई संदर्भात आसनगांवसह इतर कोणत्याही पाणीवापर संस्थांची तक्रार नाही.

आसनगाव येथे सद्य:स्थितीत तीन नळ पाणीपुरवठा योजना असून त्यापैकी दोन योजना सुरु आहेत. एक योजनेचा Transformer बिघडल्याने योजना बंद आहे. त्यासाठी विद्युत विभागाकडे ग्रामपंचायतीमार्फत पाठपुरावा सुरु आहे.

तसेच नागरी सुविधा योजनेतून आसनगाव नळ पाणीपुरवठा योजनेमधील उध्दरण वाहिनी बदलण्याचे काम प्रस्तावित असून, निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

-----------------

## दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यातील शालेय पोषण आहार योजनेची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * ३४८३३ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यात शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनासाठी लागणारे इंधन, भाजीपाला व सकस आहाराचे देयक तसेच स्वयंपाकी व मदतनीस यांचे मानधनाचे रुपये ८८ लाख थकित असून शालेय पोषण आहार योजनेमुळे शिक्षक, कामगार महिलांचे हाल तसेच बालकांचे कुपोषण होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच तांदूळ, डाळीसह इतर साहित्य शासनामार्फत पुरविले जाते व त्यासाठी लागणारे इंधन, भाजीपाला व पूरक आहार मुख्याध्यापकांमार्फत पुरविले जात असून सदर खर्चाचे देयक मागील ७ महिन्यांपासून अदा करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर देयक थकित असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वयंपाकी, मदतनीस यांचे थकित मानधन देण्याबाबत कार्यवाही करुन नियमित देयक न देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सेंट जोसेफ स्कूल (नविन पनवेल) या शाळेवर कारवाई करण्याबाबत

**(२४) * ३४७६८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३२८४५ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंट जोसेफ स्कूल (नवीन पनवेल) शाळेच्या विरोधात शुल्कवाढीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व पालकांनी माहे सप्टेंबर, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहात आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळेचा शुल्क वाढीबाबतचा प्रश्न मागील दोन वर्षापासून प्रलंबित असून शाळेची मनमानी वाढली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर तक्रार प्राप्त झाली असून या प्रकरणी शाळेने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे.

-----------------

## कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या कारभाराची चौकशी करण्याबाबत

**(२५) * ३५४०९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधींनी श्री फारूख पठाण, कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग यांच्या कारभाराची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.अल्पसंख्याक विकास मंत्री यांच्याकडे मुद्देनिहाय व सविस्तर तक्रार सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नोंदविलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारीतील सर्व मुद्दयांची मुद्देनिहाय चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन श्री.पठाण, कक्ष अधिकारी यांच्याविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) तक्रारीतील सर्व मुद्यांची मुद्देनिहाय चौकशी करण्यात आली असुन या तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम जिल्हयातील कलावंतांना मानधन देण्याबाबत

**(२६) * ३५९३१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील २७८ कलावंतांचे मानधन मागील ७ ते ८ महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कलावंतांचे मानधन प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त कलावंतांचे मानधन त्यांच्या बँकेच्या खात्यात जमा करण्याबाबत कार्यवाही करुन मानधन बँकेत जमा करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) वाशिम जिल्हयातील मंजूर कलावंतांची संख्या २७८ इतकी नसून ती एकूण १७८ इतकी आहे. लाभार्थ्यांचे खाते क्रमांक व आयएफएसी कोड प्राप्त नसल्याने कलावंतांच्या खात्यावर मानधन जमा करण्यात आलेले नव्हते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील ज्येष्ठ कलावंतांना मानधन देण्याबाबत

**(२७) * ३५६०९ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील ज्येष्ठ कलावंतांचे मानधन मागील चार ते पाच वर्षापासुन थकित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कलावंत म्हणून समाजात जनजागृती केल्यानंतर उतारवयात जीवन जगता यावे या हेतूने शासनातर्फे हे मानधन दिले जात असताना मागील काही वर्षापासून ज्येष्ठ कलावंतांना जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ज्येष्ठ कलावंतांना मानधन वितरीत करण्याबाबत कार्यवाही करुन सदर कामास विलंब करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा उभारण्याबाबत

**(२८) * ३६१४५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक २८६४६ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १०० शाळा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यासाठी केंब्रिज विद्यापीठ व ब्रिटीश कौन्सिलची मदत घेण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील सर्व माध्यमाच्या सर्व शाळांची शैक्षणिक गुणवत्ता आंतरराष्ट्रीय शाळांच्या दर्जाच्या तयार करणे. सदर शाळा या टप्प्याटप्याने करण्यात येणार असून आजमितीस नंदुरबार येथे एक शाळा प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली आहे. या साठी सर्व शिक्षा अभियान तसेच CSR च्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन घेण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात चांगला पाऊस होवूनही पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरची संख्या वाढल्याबाबत

**(२९) * ३६२७५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३१२ गावे आणि १५०४ वाड्यांना माहे सप्टेंबर, २०१७ अखेर ३०० पेक्षा अधिक टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी याच कालावधीत १५० पेक्षा कमी गावे व ३८० पेक्षा कमी वाड्यांमध्ये २०४ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात गत वर्षात मागील वर्षीपेक्षा चांगला पाऊस होवूनही टँकरची संख्या वाढण्याची सर्वसाधारण कारणे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) मागील वर्षी दिनांक ०६/०९/२०१६ रोजीच्या साप्ताहिक टँकर अहवालानुसार राज्यात १४४ गावे, ६८० वाडयांमध्ये एकूण २०४ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु होता.

(३) दिनांक १३ जून, २०१६ च्या साप्ताहिक टँकर अहवालानुसार त्या सप्ताहात सन २०१६ या वर्षातील सर्वाधिक ६१४० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु होता.

दिनांक १२ जून, २०१७ च्या साप्ताहिक टँकर अहवालानुसार त्या सप्ताहात सन २०१७ या वर्षातील सर्वाधिक १६६६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु होता.

राज्यात मागील वर्षीपेक्षा यावर्षी चांगला पाऊस झाल्यामुळे टँकर संख्या कमी झाली आहे. तथापि, २०१७ च्या पावसाळयात सप्टेंबर, २०१७ पर्यंत पुणे विभागात पर्जन्यमान कमी झाल्यामुळे सप्टेंबर, २०१६ च्या तुलनेत सप्टेंबर, २०१७ मध्ये चालू असलेल्या टॅकरची संख्या जास्त दिसून येते. मात्र त्यानंतर ऑक्टोबर, २०१७ मध्ये चांगला पाऊस झाल्याने दिनांक २४/१०/२०१७ पासून पुणे विभागातील टँकर्स बंद करण्यात आले होते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सीमावर्ती भागात असलेल्या वाचनालयांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत

**(३०) * ३६३८८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सीमावर्ती भागात असलेल्या वाचनालयांमध्ये मराठी भाषेतील विविध वाङमयीन पुस्तके मराठी भाषिकांना उपलब्ध करून देण्यासाठी कर्नाटक शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळत नसल्याने लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्र शासनाकडून आर्थिक साहाय्य मिळण्याबाबतची मागणीपत्रे दिनांक २६ जुलै, २०१७ व २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी मा.वित्त मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागात मराठी भाषा व संस्कृतीचा विकास आणि समृध्दी करण्याच्या हेतूने अर्थसहाय्य देण्याची योजना नियमितपणे राबविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर व वाशिम जिल्हयात स्त्रीयांवरील अन्यायाप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(३१) * ३६४३७ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकमहूद (ता.सांगोला, जि.सोलापूर) गावात तसेच मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यात स्वच्छता अभियानाच्या नावाखाली मोहिम राबविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी मर्यादेचे उल्लंघन करुन एका गर्भवती महिलेला उघडयावर शौचालय केल्याच्या कारणास्तव गळयात हार घालून फोटो सेशन केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छता अभियानाच्या नावाखाली राज्याच्या विविध भागात होत असलेल्या स्त्रीयांवरील अन्यायाबाबत राईट टू पी ने राज्याच्या मुख्य सचिवाकडे एक लेखी तक्रार माहे ऑक्टोबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात सादर करून संबंधित दोषींविरोधात कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) श्रीमती सुप्रिया जाण, राईट टू पी चळवळ कार्यकर्ती, मुंबई यांनी दिनांक ०८/१०/२०१७ रोजी सांगोला तालुक्यातील चिकमहूद गावात महिलांच्या सन्मानाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कार्यवाही करण्याबाबत एक निवेदन मुख्य सचिव यांना दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांना उचित कार्यवाही करुन याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविले आहे. सदर अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नसून अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे व नागपूर जिल्हयाच्या शहरी भागात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जनजागृती केली नसल्याबाबत

**(३२) * ३६७४६ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, नागपूर या जिल्हयाच्या शहरी भागात दिनांक १८, १९ व २० ऑक्टोबर, २०१७ रोजी प्रदूषणाची पातळी जास्त असूनही फटाक्याच्या प्रदूषणामुळे आरोग्याला होणाऱ्या त्रासाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सखोल जनजागृती केली नसल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे नाही. या साठी राज्यस्तरावर सर्व माध्यमांव्दारे व्यापक जनजागृती मोहिम राबविली आहे. तसचे मा.मुख्यमंत्र्यांनी फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना दिली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिग्रस (जि.यवतमाळ) येथील स्वस्त धान्य दुकानावर कारवाई करण्याबाबत

**(३३) * ३७०३० श्री.मोहनराव कदम, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०६५९ ला दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस (जि.यवतमाळ) येथील स्वस्त धान्य दुकानावर शिधापत्रिकाधारकांना धान्य कमी देणे, जादा पैसे घेणे व मर्जीतील लोकांना धान्य देणे इत्यादी प्रकार होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक नागरिकांनी निवेदन देऊनही संबंधित दुकानदार मनमानी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्वसामान्यांच्या हक्काचे धान्य देण्याऐवजी मनमानी करणाऱ्या स्वस्त धान्य दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, दिग्रस तालुक्यातील मौजा वरंदळी येथील रास्तभाव दुकानाविरुध्द अंत्योदय योजनेंतर्गत ३५ किलो धान्याच्या ऐवजी ३० किलो धान्य मिळत असल्याबाबत दिनांक १२/१०/२०१७ च्या अर्जान्वये तहसिलदार, दिग्रस यांचेकडे तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारीच्या अनुषंगाने पुरवठा निरिक्षक, दिग्रस यांनी सविस्तर चौकशी केली असता तक्रारदार यांनी अनावधानाने तक्रार केली व त्यांना धान्य बरोबर मिळाल्याबाबत चौकशीच्यावेळी बयान दिले. तक्रारीमध्ये काही तथ्य नसल्याचे निदर्शनास आले.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शासनाचे शिक्षणविषयक धोरण सतत बदलत असल्याबाबत

**(३४) * ३७२०४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाचे शिक्षणविषयक धोरण सतत बदलत असल्याने शिक्षकांमध्ये तणाव व संभ्रम पसरला असून शिक्षण विभागाकडून वारंवार शासन निर्णय निघत असल्याने विना वेतन काम करणाऱ्या मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील शाहीर अण्णाभाऊ साठे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक बाबुराव परशुराम पवळे यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना पत्र लिहून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिनांक २० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सततच्या बदलावामुळे शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या अभ्यासांकडे दुर्लक्ष होत असून शिक्षणविषयक धोरणात सुसूत्रता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन शासनस्तरावर वेळोवेळी आवश्यक ते आदेश दिले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील कयाधू नदी सांडपाण्यामुळे प्रदुषित झाल्याबाबत

**(३५) * ३७३५८ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगांव, हिंगोली, कळमनुरी (जि.हिंगोली) या तीन तालुक्यातून वाहत असणारी कयाधू नदी हिंगोली शहरातील सांडपाण्यामुळे प्रदुषित झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही नदी प्रदुषित झाल्यामुळे तिन्ही तालुक्यातील पाणी दुषित झाल्याने तेथील जनतेला पिण्याच्या पाण्यामुळे अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिंगोली जिल्ह्यातील प्रदुषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही, प्रश्नाधीन तिन्ही तालुक्यांना कयाधू नदीवरुन पाणीपुरवठा करण्यात येत नाही.

(३) व (४) सदर प्रदूषण रोखण्याकरिता नगरपरिषद, हिंगोली यांच्यावतीने १५ दशलक्ष घनमीटर (MLD) क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्राची (STP) उभारणी करण्यात येत आहे.

-----------------

## तुमसर पंचायत समिती (जि.भंडारा) अंतर्गत असलेली रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) * ३७४१५ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) पंचायत समिती अंतर्गत १९ मुख्याध्यापक, १७ पदवीधर शिक्षक व ४ सह शिक्षिका अशा एकूण ४० शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुख्याध्यापकाची पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत असून शिक्षकांची रिक्त पदे "पवित्र" या संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक २३/०६/२०१७ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या कार्यपध्दतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षकांची ऑनलाईन कामे रद्द करण्याबाबत

**(३७) * ३५४८१ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.कपिल पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शाळांमधील विविध शालेय माहिती ऑनलाईन भरण्याचे काम सन २०१५ पासून शिक्षक करीत असून राज्यातील सर्व विद्यार्थी एका क्लिकवर उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने शिक्षण विभागाकडून सरल या संगणक प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांची माहिती भरुन घेण्याचे काम शासनाने शिक्षकांवर सोपविले असल्याने शालांतर्गत मूल्यमापन, परीक्षांचे निकाल, विद्यार्थ्यांची माहिती, विद्यार्थ्यांची व पालकांची बँक अकाऊंटस, मतदार नोंदणी, आधारकार्ड याबद्दलची सर्व माहिती ऑनलाईन भरणे, शाळेत विविध दिवस साजरे करुन त्यांचे अहवाल पाठविणे, शौचालयांची पाहणी करणे या अशैक्षणिक कामास विरोध करण्यासाठी औरंगाबाद, हिंगोली, पुणे, जळगाव, कोल्हापूर आदि जिल्हयातील शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शासनाच्या विरोधात आंदोलन केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांची माहिती भरताना शिक्षकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून संकेतस्थळ अत्यंत संथगतीने सुरु असणे तर कधी कधी बंदावस्थेत असणे, वंजारी जात ही एनटीडी ऐवजी एनटीबीमध्ये समाविष्ट करणे, विद्यार्थ्यांचे पालक अकाऊंटची माहिती देत नसणे, परराज्यात जन्मलेल्यांची नावे नोंदी करण्यास अडचणी येणे, एक कॉलम जरी भरायचा राहिला तरी माहिती सेव्ह न होणे, अपंग विद्यार्थी असल्यास त्याची संपूर्ण माहिती भरावी लागत असून ती पालकांकडे नसणे, यामुळे शिक्षकांना त्यांच्या तासिकेवर जाण्यास वेळ न मिळणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर त्याचा परिणाम होत असणे तसेच सदर ऑनलाईन कामासाठी शासनाने शाळांना स्वतंत्र इंटरनेट सुविधा पुरविली नसून ग्रामीण व शहरी भागात इंटरनेट सुविधा सक्षम नसल्याने त्याचा त्रास शिक्षकांना होत असल्याने शालेय माहिती भरण्यासाठी वेळ वाया जात असून शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या शिकविण्याकडेही दुर्लक्ष होत असल्याने शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँक अकाऊंटस, आधारकार्ड आणि अन्य तपशीलाची माहिती ऑनलाईन भरण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग नसल्याने त्या कामासाठी शासन आऊटसोर्सींग करणार असल्याने तोपर्यंत सदर निर्णय स्थगित ठेवण्याचा शासनाचा विचार असून शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या ३२ प्रकारच्या अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असून त्यामुळे शिक्षणाचा दर्जा कमी होवून शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत असल्याने मराठी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील दोन वर्षात शासनाच्या आग्रहामुळे १ लाख ५८ हजार ५८३ शिक्षकांनी तंत्रज्ञान अवगत करुन शासनाच्या संकेतस्थळावर अधिकृत तंत्रस्नेही शिक्षक म्हणून त्यांची नोंदणी करण्यात आली असून त्यांचा सन्मान करण्याऐवजी त्यांच्याकडून डाटा एन्ट्रीचे काम करवून घेण्याच्या सूचना दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, मागील दहा वर्षापासून राज्यातील अनुदानित मराठी/हिंदी माध्यमाच्या शाळांमधील शिक्षकांना मतदार याद्या पुनः निरीक्षण, वार्डाचे कुटुंब सर्वेक्षण, निवडणुकीची कामे व इतर सर्व्हेची कामे देऊन त्यांना वर्षभर या कामात गुंतवून ठेवण्यात येत असल्याने या प्रकरणी मा.उच्च न्यायालय

आणि मा.सर्वोच्च न्यायालयाने शासनाला सूचित करून शिक्षकांना मतदानाच्या दिवासाव्यतिरिक्त इतर कोणतीही अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नये असे निर्देश दिले असतांना या आदेशाची अंमलबजावणी शासन करीत नसल्याने अशैक्षणिक कामातून शिक्षकांची व शिक्षण क्षेत्राची सुटका करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात दिले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ४ मे, २०१७ रोजी व त्यासुमारास अनेकवेळा निवेदने देऊन मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करुन शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त करुन शिक्षकांवरील अतिरिक्त कामाचा ताण कमी करण्याच्यादृष्टीने एक अतिरिक्त पद भरण्याबाबत तसेच अशैक्षणिक कामासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबत तसेच शिक्षण हक्क कायदा, २००९ नुसार शिक्षकांना केवळ अध्यापनाचे काम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(६) याबाबत तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्‌यार्थ्यांसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्याबाबत

**(३८) * ३४६९२ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ३०९४५ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्‌यार्थ्यांसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जून, २०१७ रोजी शासनाकडे केलेल्या मागणीनुसार शासनाने सदर मागणीसंदर्भात पडताळणी करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाला कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयाकडून शासनास अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अहवालानुसार येवला येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) तंत्रशिक्षण संचालनालयाने सादर केलेल्या अहवालानुसार पदविका अभ्यासक्रमांच्या (तंत्रनिकेतन) बाबत नाशिक विभाग व जिल्ह्यातील रिक्त जागांचे प्रमाण मागील तीन वर्षापासून सतत वाढत असून ते २८.६०% वरुन ४९.२३% पर्यंत झालेले आहे. तसेच नाशिक विभागातील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता अल्पसंख्यांकांच्या प्रवेशित आकडेवारी वरुन असे निदर्शनास येते की, केंद्रीय प्रवेशाच्या (CAP) ७५% जागा रिक्त आहेत. नाशिक जिल्ह्यातील व येवला तालुक्यातील सध्या सुरु असलेल्या तंत्रनिकेतनामध्ये रिक्त जागांचे प्रमाण जास्त असल्यामुळे येवला, जिल्हा नाशिक येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन स्थापन करण्याची आवश्यकता नाही.

-----------------

## राज्यातील शारिरीक शिक्षण शिक्षकांना न्याय देण्याबाबत

**(३९) * ३५२४३ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ३३०४९ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इयत्ता १ ली ते १० वी च्या वर्गांसाठी शारिरीक शिक्षकांच्या तासिका पूर्ववत करुन त्यांच्या न्याय मागण्या निकाली काढण्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जुलै, २०१७ व दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास न्याय देण्याची मागणी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेयस्तरावर कार्यरत शारिरीक शिक्षकांचे पद व्यपगत करून त्यांना सहायक शिक्षकांमध्ये समाविष्ट करण्याचा शासनाचा विचार असून याबाबत शासनाने योग्य निर्णय घेऊन शारिरीक शिक्षकांना न्याय दिला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शारिरीक शिक्षकांच्या न्याय मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२) नाही.
(३) शारिरीक शिक्षणाच्या तासिका पूर्ववत करण्याबाबत महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांचेमार्फत दिनांक ०५/१०/२०१७ रोजी सुधारित परिपत्रक काढण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सन २०१५-२०१६ च्या संच मान्यतेच्या प्रस्तावांची दुरूस्ती करून सुधारित संच मान्यता देण्याबाबत

**(४०) * ३६२१६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३०९३ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१५-२०१६ या वर्षाच्या संच मान्यतामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्याने संच मान्यता दुरूस्त करण्याच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांच्या छाननीचे सुरु असलेले काम पुर्ण झाले आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावांची दुरुस्ती करून सुधारित संच मान्यता देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(४१) * ३५६८२ आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत असलेल्या शिक्षक, शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना तसेच नियुक्त मान्यता प्राप्त खाजगी, अनुदानित, विनाअनुदानित, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना आणि भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याबाबतची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करुन राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेत कर्मचाऱ्यांच्या लाभाचा व मृत कर्मचाऱ्यांच्या वारसाच्या न्याय हक्काचा विचार करण्यात आलेला नसल्याने अंशदान निवृत्तीवेतन योजनेची कपात थांबवावी व जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करावी, यासाठी शिक्षक संघटना व शिक्षक कर्मचाऱ्यांकडून वेळोवेळी आंदोलने करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयाचे मुंबई, औरंगाबाद व नागपूर खंडपीठ याठिकाणी दाखल केलेल्या याचिकांचे प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने सदरील कर्मचाऱ्यांची कपात थांबविणेबाबत अंतरिम आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सन २००५ पासून नियुक्त झालेल्या राज्य शासकीय, निम शासकीय, अनुदानित शाळेतील शिक्षक, कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना शासनाने जुनी पेन्शन योजना, कुटूंब निवृत्तीवेतन योजना आणि भविष्य निर्वाह निधी योजना बंद करुन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू केली आणि आता पुन्हा नव्याने फेरबदल करुन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना सुरु केली असून या दोन्ही योजनांमुळे माहे नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत असलेल्या शिक्षक, कर्मचारी आणि अधिकारी यांना सेवानिवृत्तीनंतर

उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार असून निवृत्तीवेतनावर अवलंबून असणाऱ्या कुटूंबियांवर उपासमारीची वेळ येणार असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवृत्तीनंतरचे जीवन जगणाऱ्या निवृत्तीवेतनधारकांबाबत तसेच नविन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४२) * ३५३९६ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३१४७४ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक व मुख्याध्यापकांची ३० हजाराहून अधिक पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने जिल्हानिहाय प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या रिक्त पदांची संख्या किती आहे, तसेच सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जनाचे काम पुर्ण क्षमतेने व्हावे याकरिता सदरील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे रिक्त पदांवर समायोजन पूर्ण झाल्यानंतर उर्वरीत रिक्त पदे "पवित्र" या संगणकीय प्रणालीव्दारे दिनांक २३ जून, २०१७ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपध्दतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

## कुर्झे (ता.तलासरी, जि.पालघर) येथील शासकीय गोदामातून पुरवठा केलेला तांदूळ व गहू खतमिश्रीत असल्याबाबत

**(४३) * ३४६७५ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्झे (ता.तलासरी, जि.पालघर) येथील वनिता महिला बचतगट रास्तभाव दुकान गट क्र.१ मधून ऑगस्ट महिन्यात शासकीय गोदामातून पुरवठा केलेले तांदूळ व गहू खतमिश्रीत असुन तांदळाच्या गोण्यातील वितरीत केलेला तांदूळ खाल्याने ग्राहकांना पोट दुखणे, मळमळ होणे, चक्कर येणे आदि त्रास झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी लाभार्थ्यांना वाटप केलेले धान्य परत घेण्यात आले असून, त्याबदल्यात त्यांना धान्य बदलून देण्यात आले आहे. परत घेतलेले धान्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात आले असता, त्यांच्या अहवालात सदर धान्य मानवास खाण्यास अखाद्य असल्याबाबत स्पष्ट उल्लेख नसून, सदर धान्य ९० टक्के चांगले असल्याबाबत प्रयोगशाळेने प्रमाणपत्र दिलेले आहे. सदर धान्य तपासणीअंती मानवास खाण्यास अयोग्य असल्याचे नमूद नसल्याने, संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राहय धरुन त्यांना इतर लाभ देण्याबाबत

**(४४) * ३५१३१ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात सन १९९१ ते मार्च, २००० याकालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राहय धरुन त्यांना इतर सर्व अनुषंगिक लाभ देणेबाबत मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार सोलापूर, अमरावती इत्यादी काही उच्च शिक्षण सहसंचालकांनी संबंधित याचिकाकर्त्यांना सेवाविषयी बाबींचे सर्व लाभ देण्याबाबत कार्यवाही केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद, जळगांव, नांदेड इत्यादी शिक्षण सहसंचालकांनी निकाल लागलेल्या याचिकाकर्त्या अधिव्याख्यात्यांना वेतन निश्चितीचे लाभ व सेवाग्राहय धरण्याबाबतची कार्यवाही पूर्ण केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांबाबत शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केलेली असून सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षण विभागाची व्हिडीयो कॉन्फरन्स केंद्रे बंद झाल्याबाबत

**(४५) * ३६९५० श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४३९० ला दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्कात राहण्याकरिता शिक्षण विभागाने सुरु केलेल्या १२० पैकी ९७ व्हिडीयो कॉन्फरन्स केंद्रे बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील शाळांमध्ये ई-लर्निंगसाठी खरेदी करण्यात आलेल्या साहित्यांमध्ये गैरव्यवहार झाला असून उपलब्ध असलेले साहित्य उपयोगात आणले जात नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार बंद पडलेली व्हिडीयो कॉन्फरन्स केंद्रे सुरु करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे तसेच ई-लर्निंग साहित्य गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) सदर ९७ व्हिडीयो कॉन्फरन्स केंद्र सुरु करण्यासाठी Bandwidth Connectivity पुरवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या असून यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांसाठी संरक्षण कायदा तयार करण्याबाबत

**(४६) * ३६०२२ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघोली (जि.पुणे) येथे वाडे बोल्हाई येथील १९ वर्षे वयाच्या कुमार सुनिल पोपट भोर या विद्‌यार्थ्याने श्री धनंजय आबनावे या शिक्षकावर गंभीर हल्ला केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार डॉक्टराप्रमाणे शिक्षकांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने कायदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच हा कायदा किती कालावधीत करण्यात येईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) शाळेमध्ये बेशिस्तपणे न राहण्याबाबतच्या सूचना संबंधित विद्‌यार्थ्यास शिक्षकाने दिलेल्या होत्या. त्यानुषंगाने सदर घटना घडलेली आहे. सदर घटनेबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरण पोलीस तपासाधिन आहे.

शिक्षकांना संरक्षण देण्याच्यादृष्टीने कायदा करण्याची बाब सद्‌य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(४७) * ३६७९५ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत औद्योगिकरणाबरोबरच लोकसंख्या तसेच वाहनांची वाढणारी संख्या यामुळे प्रदूषणात वाढ झाल्याने मुंबई राज्यात पहिल्या तर देशात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे 'सफर' या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदूषण वाढीची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याबाबत कार्यवाही करुन प्रदूषणकारी घटकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) मुंबईमध्ये अविरत सुरु असलेली बांधकामे आणि वाहनांच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात होत असलेली वाढ ही मुंबईत वाढलेल्या प्रदूषणासाठी जबाबदार आहेत.

(३) मुंबई व सभोवतालच्या परिसरातील हवेची गुणवत्ता मोजमाप करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई महानगरपालिका व राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था यांच्यावतीने ४ ठिकाणी १३ संयत्रणांची उभारणी करण्यात आली आहे. मुंबई शहरातील प्रमुख जंक्शनवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने निरी (NEERI) व आयआयटी (IITB) मुंबई यांच्या सहयोगाने प्रायोगिक तत्वावर हवा शुध्दीकारण यंत्रणा (विंड ओग्मॅटेशन आणि प्युरीफायींग युनिट) बसविण्यात आली आहेत. तसेच मुंबई शहरातील वाढत्या प्रदूषणावर आळा घालण्याकरिता कृती आराखडा तयार करण्याचे काम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आयआयटी, मुंबई व निरी (NEERI) या संस्थांच्या सहकार्याने सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई आणि ठाणे औद्योगिक विकास महामंडळातील कारखान्यांच्या विषारी गॅसमुळे प्रदूषण झाल्याबाबत

**(४८) * ३५६३२ श्री.जयंत पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही आशिया खंडातील सर्वात मोठी केमिकल कंपन्यांची वसाहत असून सदर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अनेक कंपन्यांमधून रात्री विषारी गॅस वातावरणात तसेच केमिकलमिश्रीत पाणीही पावसाळ्याच्या दिवसात नाल्यांमध्ये सोडले जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई येथील नेरुळ, जुईनगर व शिरवणे परिसरात या कंपन्यांकडून दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री दीडच्या सुमारास विषारी गॅस सोडण्यात आल्याने त्याचा परिणाम या भागातील नागरिकांच्या आरोग्यावर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन फुटणे, चेंबर ओव्हरफ्लो होणे अशा घटना तात्काळ एमआयडीसी व सीईटिपी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येतात व त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तात्काळ कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार सप्टेंबर-ऑक्टोंबर, २०१७ दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर औद्योगिक वसाहतीमध्ये करण्यात आलेल्या पाहणीनुसार तीन उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश, चार उद्योगांना प्रस्तावित आदेश व पाच उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील राष्ट्रीय मल्लखांब व इतर खेळाडूंना शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण देण्याबाबत

**(४९) * ३५६२३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राष्ट्रीय खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जुलै, २०१६ पूर्वी पात्र असलेल्या मल्लखांब व इतर खेळातील राष्ट्रीय खेळाडूंना शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण लागू असून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ च्या शासन आदेशाने मल्लखांब व इतर खेळ जे ऑलिम्पिक खेळामध्ये समाविष्ट नाहीत त्या खेळाचे शासकीय सेवेतील ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ जुलै, २०१६ पूर्वी शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षणास पात्र असलेल्या राष्ट्रीय मल्लखांब व इतर खेळाडूंना आरक्षण देण्याबाबत शासनाकडे निवेदने प्राप्त झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक १ जुलै, २०१६ पूर्वी पात्र असलेल्या राष्ट्रीय मल्लखांब व इतर खेळाडूंना शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय.

(४) शासनाच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रकान्वये "मल्लखांब" खेळातील राज्यातील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ टक्के आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक विभागातील शिक्षकांच्या रिक्त जागांबाबत

**(५०) * ३५०१९ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माध्यमिक विभागात १९ हजार रिक्त जागा आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची मुंबईसह जिल्हानिहाय वस्तुस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन सदर जागांवर न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यात बिगर अल्पसंख्याक अनुदानित शाळामध्ये ५३६८ पदे रिक्त होती. सन २०१६-१७ च्या संच मान्यतेनुसार राज्यात ३३३१ शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत, त्यापैकी १४६५ शिक्षकांचे ऑनलाईन समायोजन जिल्हास्तरावर पूर्ण झाले आहे. समायोजनानंतर माध्यमिक अनुदानित शाळामध्ये ३९०३ पदे रिक्त आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यात अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत

**(५१) * ३७३३८ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात ४३ शाळा अनधिकृत असल्याचे शिक्षण विभाग, पंचायत समिती, वसई यांनी अधिकृतरित्या जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर ४३ शाळा चालकांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) अनधिकृत शाळा बंद करणेबाबत संबधित संस्थाना/शाळांना नोटीस दिलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टाकळी (ता.माढा, जि.सोलापूर) येथे शौचालयांसाठीच्या निधीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५२) * ३६५९३ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकळी (ता.माढा, जि.सोलापूर) गावात शौचालयांसाठी देण्यात आलेल्या निधीत गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार शौचालयांसाठी देण्यात आलेल्या निधीत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

मौजे टाकळी (टे) ता.माढा, जि.सोलापूर या गावात २४ शौचालयाचे बांधकाम न करता व १६ शौचालयाचे बांधकाम अपूर्ण असताना अनुदानाचे प्रस्ताव सादर केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय.

मौजे टाकळी (टे) ता.माढा, जि.सोलापूर या गावात २४ शौचालयाचे बांधकाम न करता व १६ शौचालयाचे बांधकाम अपूर्ण असताना अनुदानाचे प्रस्ताव सादर केल्याचे चौकशीअंती निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने गटविकास अधिकारी पंचायत समिती कुर्डुवाडी यांनी संबंधित ग्रामविकास अधिकारी, सरपंच, विस्तार अधिकारी (पं) व शाखा अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजाविली असून प्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच

मौजे टाकळी (टे) ता.माढा, जि.सोलापूर या गावास उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पा.व स्व.) जि.प. सोलापूर व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी यांनी दिनांक ०६/११/२०१७ रोजी प्रत्यक्ष भेट देवून चौकशी केली आहे व चौकशीचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर यांना सादर केला असून मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांस्कृतिक कार्य विभागाचे संकेतस्थळ अद्ययावत करण्याबाबत

**(५३) * ३५०४६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सांस्कृतिक कार्य विभागाच्या योजना, कार्यक्रम, अनुदानासंदर्भातील माहिती, अनुदानाचे अर्ज, विविध कार्यक्रमांच्या निविदा याबाबतची माहिती सर्वसामान्य जनतेला व लोककलावंतांना तसेच संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना वेळीच अवगत व्हावी म्हणून सांस्कृतिक कार्य विभागाचे संकेतस्थळ शासनाने कार्यान्वित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे संकेतस्थळ अद्ययावत करण्यात न आल्यामुळे मागील ८ ते १० महिन्यांपासून लोककलावंत व सांस्कृतिक संस्था चालकांना सांस्कृतिक कार्य विभागात वारंवार यावे लागत असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संकेतस्थळ तातडीने अद्यावत करण्यात यावे, अशी मागणी मा.सांस्कृतिक कार्य मंत्री, व्यवस्थापकीय संचालक, सांस्कृतिक कार्य विभाग व सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याकडे मागील अनेक महिन्यांपासून लोककलावंत व सांस्कृतिक कार्य संस्थाचालकांकडून करण्यात येत असल्याचेही माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून विभागाचे संकेतस्थळ अद्यावत न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संकेत स्थळ अद्यावत करण्याबाबत कार्यवाही करुन त्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हो, हे खरे आहे.
(२ व (३) हे खरे नाही.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (खुद्द) साठी सध्या संकेतस्थळ अस्तित्वात आहे. सदर संकेतस्थळाऐवजी विभागाकरिता नवीन संकेतस्थळ तयार करण्याची कार्यवाही सुरू असून त्याकरिता आवश्यक ती माहिती माहिती तंत्रज्ञान संचालनालयास उपलब्ध करून देण्यात आली असून ते लवकरात लवकर कार्यान्वित होईल.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लिंगायत समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(५४) * ३५४४१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लिंगायत समाजाला संवैधानिक मान्यता व अल्पसंख्याकाचा दर्जा मिळावा या प्रमुख तसेच इतर मागण्यासाठी लिंगायत समाजाने दिनांक ३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लातूर येथे महामोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समाजास आरक्षण व इतर सवलती देण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याची थोडक्यात माहिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) विभागाने दिनांक २१/०७/२०१४ रोजीच्या पत्रान्वये लिंगायत समाजाला अल्पसंख्याक दर्जा देण्यासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या अहवालाची माहिती अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाकडून मागितली होती. त्यांनी राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे दिनांक १३/०५/२०१४ रोजीचे अभिप्राय राज्य शासनास पाठविले आहेत व त्यामध्ये लिंगायत हा स्वतंत्र धर्म नसून हिंदू धर्माचा एक पंथ असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सन २०११ च्या जनगणनेमध्ये लिंगायत समाजासाठी स्वतंत्र नोंद घेण्यात आलेली नाही. सबब, लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माचा व अल्पसंख्याक दर्जा देणे अनुज्ञेय नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दुधात भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५५) * ३५९९३ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दूधात दोन लाख लिटर पाण्याची भेसळ करुन दूध विक्री केली जात असून त्यामुळे मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक आदी मुख्य शहराजवळील गावांमध्ये नागरिकांना चांगल्या दर्जाचे दूध मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नामवंत कंपन्यांसोबत तयार झालेल्या काही नव्या कंपन्या नियमांचे पालन न करता २.५ स्त्रिग्धांश असलेले पिशवीबंद दूध विकत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिशवीबंद दूध विक्री करताना हे ३.५ स्त्रिग्धांश व ८.५ एस.एन.एफ.चे बंधन असतांनाही गोकुळ, नंदिनी, वारणा, प्रभात, सोनई, राजहंस, पराग, अमूल तसेच अन्य कंपन्यांकडून नियमांचे पालन न करता कमी स्त्रिग्धांश असलेले दूध विक्री करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) दिनांक २० ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या दैनिक लोकसत्तामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती तथापि ही बाब खरी नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उलवे (जि.रायगड) टेकडीवरील बौध्दकालीन लेण्यांचे संरक्षण करण्याबाबत

**(५६) * ३६६१३ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई परिसरातील उलवे (जि.रायगड) टेकडीवरील वाघिवली वाडा गावाजवळ बौध्दकालीन लेणी असून या लेण्यांची बॉम्बे गॅझेटमध्ये “अडीच हजार वर्षापूर्वीच्या रायगड भागातील वाघिवली वाडा लेणी” अशी नोंद असून सन २०१३ मध्ये पुरातत्व विभागाने या लेण्यांना भेट दिली व त्यावेळी जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड यांनी या लेण्यांना संरक्षण देण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नवी मुंबईत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी उलवे टेकडी येथील सपाटीकरणाचे काम सिडकोमार्फत सुरु असून त्यात उक्त बौध्द लेणी नष्ट होण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली असून सिडकोकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अडीच हजार वर्षापूर्वीपासून असलेल्या बौध्द लेण्यांचे संरक्षण व्हावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही.

सिडको व पुरातत्व विभागाच्या समन्वयाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिमूर (जि.चंद्रपूर) येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेत उर्दू माध्यमाचे शिक्षक उपलब्ध करण्याबाबत

**(५७) * ३५५३७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, चिमूर (जि.चंद्रपूर) येथे सन १९२० पासून सुरु असून शाळेत इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे वर्ग असून या शाळेत सन २०१२-१३ मध्ये कार्यरत ४ शिक्षकांपैकी ३ शिक्षकांची बदली झाल्याने सन २०१३-१४ पासून इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत फक्त एकच शिक्षिका अध्यापनाचे कार्य करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेत वर्ग १ ली ते ५ वी ला २ शिक्षक व वर्ग ६ वी ते ८ वी करिता २ शिक्षक एकूण उर्दू माध्यमाचे ४ शिक्षक उपलब्ध करून देण्याबाबत शाळा समितीने शिक्षण विभागाला पत्र पाठवून मागणी केली, तसेच नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ जुलै, २०१७ व २५ सप्टेंबर, २०१७ रोजी शासनास पत्र पाठवून उर्दू माध्यमाचे शिक्षक उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्याबाबत निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे सन २०१० घेण्यात आलेल्या केंद्रीय भरतीपूर्व निवड चाचणी परीक्षेच्या माध्यमातून भरण्यात आली होती. सदर परीक्षेमध्ये उर्दू माध्यमातून उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांचे प्रमाण अत्यल्प होते. तसेच दरम्यानच्या कालावधीत सेवानिवृत्त, अपमृत्यू इत्यादी कारणामुळे शिक्षकांची पदे रिक्त राहिल्याचे निदर्शनास आले आहे. आता सदर रिक्त पदे "पवित्र" या संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक २३/०६/२०१७ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या कार्यपध्दतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील गैरकारभारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत

**(५८) * ३४८३९ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील गैरकारभारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) प्रश्नात नमूद तक्रार शासनस्तरावर प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, विद्यापीठातील श्री.प्रकाश अतकरे यांना देण्यात आलेली विविध पदे, बढत्या व त्यांच्या शैक्षणिक कागदपत्रांची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत दिनांक १५ जून, २०१७ च्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधी मा.आमदार श्री.बाळासाहेब सानप यांनी विद्यापीठाकडे निवेदन दिलेले होते. तसेच दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७ च्या

विद्यापीठ व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत त्यांनी सदर चौकशी त्वरीत करावी अशी मागणी केली. त्यानुसार विद्यापीठाने प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ च्या पत्रान्वये डॉ. डी. आर. नंदनवार, प्रभारी सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठित केली आहे. सदर समितीने याबाबत चौकशी करून दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी विद्यापीठास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने विद्यापीठस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील तबला वादक शिक्षकांच्या पदास मंजुरी देऊन वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत

**(५९) * ३५२२८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विभागीय सहसंचालक, शालेय शिक्षण यांच्या कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तबला वादक शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्यासाठी शासनाने मागविलेली माहिती शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४ रोजी सादर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावानुसार नागपूर विभागातील संगीत विषय शिकविणाऱ्या महाविद्यालयांची संख्या ११ असून तबला वादकांच्या ७ कार्यरत पदांपैकी ४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शिक्षकांना न्याय देण्याच्यादृष्टीने मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक ०७ ऑगस्ट, २०१७ रोजी निवेदन पाठवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) अशा आशयाचे दिनांक ०३/०४/२०१७ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे. तथापि सदर वेतनश्रेणी वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार निश्चित केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करुन विद्यार्थ्यांचे इतर गावांतील शाळेत विलिनिकरण करण्याबाबत

**(६०) * ३५९३० आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने जिल्हा परिषदेच्या/पालिकेच्या कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करुन तेथील विद्यार्थ्यांचे इतर गावांतील शाळेत विलिनिकरण करण्याचा निर्णय दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण व आदिवासी भागातील मुले शिक्षणाकडे वळावीत यासाठी शासन अनेक उपाययोजना करीत असून त्याकरीता कोटयवधी रुपयांचा निधी खर्च करीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या उक्त निर्णयामुळे सदरहू निधी वाया जाणार असून इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शेजारच्या गावातील शाळेत शिकण्यासाठी जावे लागत असल्याने विदयार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) खालावत चाललेल्या गुणवत्तेमुळे पटसंख्या खालावत असलेल्या शाळांचे जवळच्या शाळेत समायोजन करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

(२) ग्रामीण व आदिवासी भागातील मुलांच्या शिक्षणासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे, हे खरे आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्राध्यापकांचे निवृत्तीवेतनाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(६१) * ३५४२२ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राध्यापकांच्या निवृत्तीवेतनाचे प्रस्ताव सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालय, औरंगाबाद कार्यालयाने प्रलंबित ठेवले असून निवृत्तीवेतनाचा प्रस्ताव निवृत्तीवेतन विभाग, नागपूर येथे सादर करताना संबंधितांच्या नेमणूकापासून सेवानिवृत्तीपर्यंतची सर्व कागदपत्रे द्यावी लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित प्राध्यापकांनी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयाकडे सादर केले तरीही कार्यालय त्यात त्रुटी काढून सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवत असल्याने आयुष्यभर प्रभाविकपणे काम करणाऱ्या प्राध्यापकांना निवृत्तीच्या उंबरठयावर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राध्यापकांचे निवृत्तीवेतन देण्याबाबत कार्यवाही करुन सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६२) * ३६९५६ श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३१०१५ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३ हजार ८४८ शाळांमध्ये युडास (युनिफाईड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन) या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात शाळांमध्ये वीज जोडणी नसून वीज पुरवठा होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील या शाळांमध्ये वीज पुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ५२८० शाळांमध्ये वीज पुरवठा नसल्याचे सांख्यिकी माहितीनुसार निदर्शनास आले आहे.

(२) व (३) संबंधित शाळांमध्ये वीज पुरवठा करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात येत आहेत.

-----------------

## राज्यातील रात्रशाळा व रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याबाबत

**(६३) * ३६०२३ श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्रशाळा व रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी मुंबईतील रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतन मागील चार महिन्यापासून दिले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिक्षक/शिक्षकेतर अर्धवेळ कर्मचाऱ्यांना सेवाशर्ती नियमावली १९८१ अनुसार सेवा संरक्षण व इतर लाभ व भत्ते देण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) रात्रशाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती, संचमान्यता, कार्यभार व जबाबदारी तसेच अन्य सर्वसाधारण बाबी संदर्भात शासन निर्णय दिनांक १७/०५/२०१७ नुसार सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच शालार्थ वेतन प्रणालीमधून वगळण्यात आलेल्या सदर शिक्षकांचा अंतर्भाव वेतन प्रणालीत करण्याबाबतच्या सूचना सक्षम प्राधिकाऱ्यास देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ऑनलाईन औषध विक्रीला प्रतिबंध करण्याबाबत

**(६४) * ३७२५३ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औषधांची बेकायदा ऑनलाईन विक्री सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून कोणतेही प्रिस्क्रीप्शन नसताना औषधांची ऑनलाईन विक्री होत असल्याने तरुण पिढीच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ऑनलाईन औषध विक्रीला प्रतिबंध करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) औषधांची ऑनलाईन विक्री होते हे अंशतः खरे आहे.
(२) पुणे येथील दोन औषध विक्रेते ऑनलाईन पोर्टलव्दारे प्राप्त प्रिस्क्रिप्शनवर नमूद औषधांची विक्री तसेच ऑनलाईन पोर्टलव्दारे औषध विक्रीस प्रोत्साहन देत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. ऑनलाईन पोर्टलव्दारे प्राप्त प्रिस्क्रिप्शनवर औषधांची विक्री करणे तसेच प्रशासनातर्फे सदर पेढयांची तपासणी दरम्यान आढळून आलेल्या इतर त्रुटीच्या अनुषंगाने सदर पेढयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यावरील त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यावर त्यांच्याविरुध्द कायदयातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील मच्छिमार बोटींचे नुकसान झाल्याबाबत

**(६५) * ३५५७९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे आर.सी.एफ. कंपनी मागील ३० ते ३५ वर्षापासून कार्यरत असून सदर कंपनीचे सांडपाणी पाईपलाईनद्‌वारे थळ खाडीच्या चॅनेलमधून समुद्रात सोडले जाते तसेच सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन नादुरूस्त झालेली असून खाडीची धूप होऊन पाईपवर आल्यामुळे खाडीतून ये-जा करणाऱ्या मच्छिमार नौकांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अनेकदा मच्छिमार संघटनेने जिल्हा प्रशासनाकडे केलेल्या तक्रार दाखल करण्यात येवून यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्यादृष्टीने कंपनीने जिल्हाधिकारी, रायगड यांच्या सल्ल्यानुसार विशेष तज्ञांच्या मदतीने थळ-नवगांव गावाच्या मच्छिमारांच्या सुविधेकरीता जेटी बांधण्याचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे असून याबाबत आर.सी.एफ. कंपनीकडून थळ-नवगांव जेट्टी प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अतिरिक्त झालेल्या शिक्षकांच्या अतिरिक्त कालावधीतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

**(६६) * ३५७४७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१३-१४ च्या सेवकसंचानुसार विद्यार्थी संख्येअभावी शिक्षक अतिरिक्त झाले असून अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे विविध कारणाने समायोजन न झाल्याने सदर शिक्षकांचे समायोजन होईपर्यंत त्यांना मुळ शाळेतूनच वेतन अदा करण्यात येत होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिक्षकाचे मुळ शाळेत व समायोजित शाळेत समायोजन न केल्यामुळे शिक्षकांच्या अतिरिक्त कालावधीतील सेवेचा कोठेही उल्लेख केला जात नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिक्षकांचा अतिरिक्त कालावधीतील सेवाकाल ग्राह्य धरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठांच्या दर्जा वाढीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात वाढीव तरतूद करण्याबाबत

**(६७) * ३५२११ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांना जागतिक दर्जा प्राप्तीसाठी मा.पंतप्रधानांनी जाहिर केलेल्या योजनेत महाराष्ट्रातील विद्यापीठाचा समावेश करण्याबाबत शासनाने प्रस्ताव तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती आणि तपशील काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यापीठांच्या दर्जा वाढीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात वाढीव तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) माननीय पंतप्रधान महोदयांनी पाटणा विद्यापीठाच्या दिक्षांत समारोहा प्रसंगी राज्यातील नामांकित विद्यापीठे/अभिमत विद्यापीठांना जागतिक दर्जा प्राप्त करण्यासाठी सर्वतोपरी आर्थिक सहाय्य व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करण्याचे मनोगत विषद केले होते यानुसार भारत सरकारच्या सन २०१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात माननीय वित्त मंत्र्यांनी जागतिक दर्जा प्राप्त करण्यासाठी देशांतर्गत स्पर्धेतून पात्र विद्यापीठांची निवड करुन त्यांना आवश्यक आर्थिक सहाय्य देण्याची योजना जाहिर केली व त्यानुसार देशातील विद्यापीठांकडून स्पर्धेत भाग घेण्यासाठी अर्ज मागवण्यात आले. राज्याच्या आख्यारितील विद्यापीठांनी सदर अर्ज राज्य शासनामार्फत करावयाचे असल्याने राज्यातील खालील विद्यापीठांचे प्रस्ताव सदर स्पर्धेत सहभागासाठी राज्य शासनामार्फत पाठवण्यात आलेले आहेत.

१. श्रीमती सावित्रिबाई विद्यापीठ, पुणे
२. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
३. रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई
४. फ्लेम विद्यापीठ, पुणे (खाजगी विद्यापीठ)

(२) सन २०१६ च्या माननीय वित्त मंत्री महोदयांच्या अर्थसंकल्पीय भाषणात जाहिर केल्याप्रमाणे सदर योजनेसंदर्भात केंद्र शासनाने दिनांक २९/०८/२०१७ रोजी अधिसूचना काढली असून त्यात या योजनेचे स्वरुप विषद केले आहे. सदर अधिसूचनेतील अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या उपरोक्त नमूद ४ विद्यापीठांचा प्रस्ताव सदर योजनेंतर्गत आर्थिक सहाय्यासाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत.

(३) सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाव्दारा निवड झालेल्या विद्यापीठांना थेट अर्थसहाय्य मिळणार असल्याने राज्य शासनस्तरावर वाढीव तरतूद करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हाफकिन महामंडळात पोलिओ लस खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६८) * ३५२७७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हाफकिन महामंडळाने पोलिओ उत्पादनाकरिता बल्क (घाऊक) खरेदी करून एका वर्षाकरिता सुमारे १२० कोटी रुपयांचा कच्चा माल खरेदी करण्याचा निर्णय घेऊन वर्तमानपत्रात जाहिरात न देता केवळ हाफकिन महामंडळाचे संकेत स्थळावर (वेबसाईट) दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी जाहिरात दिल्याचे दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संकेत स्थळावरील जाहिरातीनुसार फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या असून तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यामुळे शासनाच्या धोरणानुसार महामंडळाने वर्तमानपत्राद्वारे फेर जाहिरात न देता, यापुर्वीच्या प्राप्त दोन निविदांपैकी मेसर्स बायोनेट या जास्त दराच्या एका निविदाकारास ऑर्डर दिल्याने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विरोधात अन्य निविदाकाराने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर निकाल देताना महामंडळाचे अधिकार रद्द करुन ८ आठवड्यात फेरनिविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनास दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात हाफकिन महामंडळाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निकालानुसार मा.उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य ठरवून ई-टेंडरिंग करण्याचे व निविदा प्रक्रियेतील गैरव्यवहाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द महामंडळाने मा.सर्वोच्च

न्यायालयात दावा दाखल करण्याची कारणे काय व त्यासाठी शासनाची मान्यता घेतली होती काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.
(२) हाफकिन महामंडळ हे त्यांच्या पोलिओ लस उत्पादनासाठी जागतिक आरोग्य संघटना, जिनिव्हा यांनी मानांकित केलेल्या मे.पी.टी.बायोफार्मा, इंडोनेशिया या बल्क लस उत्पादकाच्या भारतातील वितरकाकडून पोलिओ बल्क घेणे अनिवार्य आहे. मे.पी.टी.बायोफार्मा यांनी भारतासाठी त्यांचे दोनच वितरक नियुक्त केलेले आहेत. परिणामी निविदा अटी नुसार जो वितरक तांत्रिक निकषांची पुर्तता करत होता त्याच वितरकाला महामंडळास बल्क पुरवठा करण्याचे आदेश दिले.
(३) होय.
(४) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७ जुलै, २०१७ रोजीच्या न्यायनिर्णयाद्वारे हाफकिन महामंडळाला नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत अनुमती दिली आहे. तसेच, सदर निविदा प्रक्रिया ई-निविदा पध्दतीने राबविण्याबाबतही सदर न्यायनिर्णयात नमूद केले आहे. तथापि, प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले नाहीत.

हाफकिन महामंडळ ही कंपनी कायद्याअंतर्गत स्थापन करण्यात आलेली संस्था असल्याने कायदेशीरदृष्ट्या एक स्वतंत्र अस्तित्व असलेली आस्थापना (separate legal entity) आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यासाठी महामंडळाने शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.
(५) व (६) प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पेठशिवाणी (ता.पालम, जि.परभणी) येथील पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(६९) * ३६९२९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठशिवाणी (ता.पालम, जि.परभणी) येथील पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहाराबाबत तेथील श्री. विठ्ठल करंजे व इतर गावकऱ्यांनी जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार नोंदवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावकऱ्यांना नविन योजनेतून नियमितपणे पाणीपुरवठा करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषीं कंत्राटदार, अधिकारी व इतर यंत्रणा यांचेविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) सदर योजनेच्या कामाबाबत गावकऱ्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत आर्थिक गैरव्यवहाराची तपासणी करण्यात आली आहे. त्यांच्या चौकशी अहवालानुसार अपहार झालेला नाही असे आढळून आले आहे. तथापि, मौ.पेठशिवणी (ता.पालम, जि.परभणी) नळ पाणीपुरवठा योजनेची एकूण किंमत रुपये १,३७,९२,४३१/- असून योजनेच्या टप्पा-३ अंतर्गत केलेल्या कामाच्या मूल्यांकनापेक्षा समितीने रुपये ३७,५१६/- इतकी रक्कम अधिक उचल केली असली तरी ती रक्कम समितीने दिनांक १७/११/२०१५ रोजी बँक खात्यामध्ये जमा केली आहे.

ग्रामपंचायतीने विद्युत देयके न भरल्याने वीज पुरवठा बंद करण्यात आला होता. तथापि, ग्रामपंचायतीने आता वीज देयक भरल्यामुळे वीज वितरण कंपनीने वीज पुरवठा पुन्हा सुरु केला आहे. उद्भव विहिरीवरील मोटारी दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरु करण्याची कार्यवाही ग्राम पाणीपुरवठा

व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत गावामध्ये एकूण १४ हातपंप व ३ विद्युत पंप याव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.